## पोलीस अधिक्षक औरंगाबाद ग्रामीण

| पोलीस अधिक्षक,कार्यालय | **प्रेस नोट** | दिनांक १०.०३.२०१७<br>०१.०० |
| --- | --- | --- |

**प्रति,**

**मा.संपादक**

**दैनिक ..........**

**विषय :–औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दाखल /उघडकीस गुन्हयांबाबत.**

यावदारे आपणास सुचित करण्यात येते की, औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दिनांक ०९.०३.२०१७ रोजी खालील प्रमाणे गुन्हे दाखल /उघडकीस आले आहेत.

**०१) पोस्टे पैठणः–** गुरन I ७९/१७ कलम ३५३ ३४ भादवि नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे गोकुळ नारायण तांदळे वय ५४ वर्ष व्यवसाय नौकरी जिल्हाक्रीडा अधिकारी तथा प्र.ता. क्रीडा अधिकारी पैठण रा. जिल्हाक्रीडा अधिकारी कार्यालय विभाग क्रीडा संकुलन परिसर गारखेडा औरंगाबाद यांनी फिर्याद दिली की यातील आरोपी नामे १) सोमनाथ परदेशी २) महिपतसिंग परदेशी दोन्ही रा. पैठण यांनी फिर्यादी हे सरकारी काम करीत असताना यातील नमुद आरोपीतांनी संगनमत करून जेसीबी समोर येवुन शासकीय कामात अडथळा निर्माण केला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास सफौ कातडे पोस्टे पैठण हे करीत आहे.

**०२) पोस्टे पिशोरः–** गुरन I ६९/१७ कलम ४५२ ३०७ ३४ भादवि नमुद गुन्हयाचे महिला फिर्यादी यांनी फिर्याद दिली की दिनांक ०८.०३.२०१७ रोजी ०१.००वा. दरम्यान यातील फिर्यादी ही तीचे घरी असतांना दोन अनोळखी व्यक्ती सामाईक इरादयाने पाणी पिण्याचे बहाण्याने फिर्यादीचे घरात येवुन अज्ञात कारणासाठी फिर्यादीचे गळयावर काहीतरी वस्तुने मारून गळा चिरून फिर्यादीस जिवे मारण्याचा प्रयत्न केला म्हणुन एमएलसी जबाबावरून गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास श्री. भटकर पोउपनि पोस्टे पिशोर हे करीत आहे.

**०३) पोस्टे वैजापुरः–** गुरन I १०९/१७ कलम ३०४(ब) ३०६ ४९८ ३४ भादवि नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे जगन्नाथ एकनाथ मुंढे वय ५५ वर्ष व्यवसाय शेती रा. पाणवखंडाळा ता. वैजापुर

यांनी फिर्याद दिली की यातील आरोपी नामे १) बाबासाहेब तानाजी मतसागर २) तानाजी मतसागर ३) पप्पु तानाजी मतसागर व ईतर एक सर्व रा. जरूर ता. वैजापुर यांनी यातील फिर्यादीची मुलगी मयत हिचा बाबासाहेब मतसागर यांचेशी ०५ वर्षापुर्वी विवाह झाला असुन मयत हिस माहेरहुन पैसे आणण्याचे कारणावरून यातील आरोपी मयताचा पती व ईतर आरोपीतांनी संगनमत करून मयतास वारंवार शारीरीक व मानसिक त्रास देवुन तीस आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास श्री. भिकाने पोउपनि पोस्टे वैजापुर हे करीत आहे.

**आकस्मात मृत्युः–**

०१) पोस्टे खुलताबादः– आ.मृ. नंबर १४/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार सफौ एस.बी. घुगे नेमणुक घाटी चौकी औरंगाबाद यांनी खबर दिली की यातील मयत नामे गजानन एकनाथ चौधरी वय ४५ वर्ष रा. बाजारगल्ली खुलताबाद यांना आज दिनांक ०९.०३.२०१७ रोजी १९.४५वा. त्याचे राहते घरी झटका आल्याने त्यास औषधोपचार कामी सरकारी दवाखाना खुलताबाद येथे दाखल करून अधिक उपचार कामी घाटी दवाखान्यात दाखल केले असता डॉ. तपासुन मयत घोषीत केले आहे वगैरे खबरी वरून आ.मृ.दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोना/९०४ नदीम पोस्टे खुलताबाद हे करीत आहे.

**मुंबई जुगार कायदाः–**

औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात पोस्टे बिडकीन ला ०१ गुन्हा मुंबई जुगार कायदया प्रमाणे ०७ ईसमा विरूध्द दाखल झाले असुन त्यांचे कडुन १४ लाख ३२ हजार ७९०/–रू. किं. जुगाराचे साहीत्य असा एकुण माल जप्त करण्यात आला आहे.

**स्वाक्षरीत**
**पोलीस अधिक्षक**
**औरंगाबाद ग्रामीण करीता**

**श्री सफौ जाधव नियंत्रण कक्ष अधिकारी औरंगाबाद ग्रामीण**